# *फेब्रुवारी महिन्यात*

# समयाला समय देणे

१ फेब्रुवारी, २०२५

आत्मीय वाचक,

वर्ष २०२५च्या फेब्रुवारी महिन्यात पदार्पण करत असताना असे काय आहे की, ज्याच्याविषयी तुम्ही सर्वात जास्त उत्सुक आहात? ही उत्सुकता तुमच्या हृदयाच्या परिपूर्णतेच्या अनुभूतीविषयीची आहे का? ती भगवान शिवाच्या चंद्राप्रति असलेली गूढगम्य ओढ आहे का?

मी या दोन्ही गोष्टींविषयी समानरूपाने उत्सुक आहे, पण मी आणखी काही वेळ चंद्राविषयीच चर्चा करू इच्छिते. चंद्र तसेच तो ज्या गोष्टीचे प्रतिरूप आहे, या दोन्ही गोष्टी मला नेहमीच मंत्रमुग्ध करतात. जसे की, आपण चंद्राला कलेकलेने वाढताना व लहान होताना पाहतो आणि यामुळे आपल्याला हे जाणवते की, काळ व्यतीत होतो आहे. तरीदेखील, चंद्र हा सदैव संपूर्णच असतो; तो कायमच एक चमकदार उज्ज्वल प्रभामंडल असतो. त्याचा बदलता आकार हा तर केवळ एक आभास, एक भ्रम आहे, जो पृथ्वीवरील आपले स्थान आणि सूर्यापासून त्याचे अंतर यांमुळे निर्माण होतो.

तेव्हा, चंद्राच्या कला हा जर एक भ्रम असेल, तर मग चंद्र आणि सूर्य यांच्यासारख्या खगोलीय पिंडांवर आधारित असलेल्या, समयाविषयीच्या आपल्या संकल्पनादेखील किती अंशी भ्रमित करणाऱ्या आहेत? आपण समयात भेद निर्माण करून त्याचे वेगवेगळ्या भागांमध्ये विभाजन करतो व त्यानुसार आपल्या जीवनाची रूपरेषा आखतो, पण मग समय हा या भेदांच्याही पलीकडे आहे का? अथवा, समय हा पाण्यासम आहे का, ज्या-ज्या गोष्टीच्या संपर्कात ते येते, जे काही आपण त्यात मिसळतो, त्याच रंगाचे ते होऊन जाते, तोच आकार ते धारण करते?

यावर विचार करत असताना, मला तुम्हाला हे सांगावेसे वाटते आहे की, वर्ष २०२५साठी श्रीगुरुमाईंचा संदेश मिळाल्याने मी त्याविषयी आत्यंतिक कृतज्ञता अनुभवते आहे. आणि हो, मला निश्चितच असे वाटते आहे की, जणूकाही गुरुमाईंनी हा संदेश *विशेषतः* माझ्यासाठीच दिला आहे. तुम्हालाही जर असेच वाटत असेल—तर मग ठीक आहे, मी तेदेखील मान्य करते! काही का असेना,

मी मात्र याविषयी खूप उत्सुक आहे की, आत्ता मी ज्या प्रकारचे प्रश्न विचारले, त्यांवर चिंतन करण्यासाठी आपल्यापाशी पुढचे एक वर्ष आहे.

माझे असे मत आहे की, आपण मानवांनी समयाचे विभाजन ज्या-ज्या विभागांमध्ये केले आहे, त्या विभागांमध्ये विशेष ऊर्जांची अनुभूती होते. उदाहरणार्थ, फेब्रुवारी महिना पाहा. या वर्षी, फेब्रुवारी महिना अमावस्येनंतर लगेच सुरू झाला आहे, जेव्हा चीनी [किंवा चांद्र] नववर्षाचा पंधरा दिवसांचा उत्सव साजरा होतो आहे. त्यानंतर, १४ फेब्रुवारीला आपण संत व्हॅलेंट्राईन दिवस साजरा करणार आहोत. हा पौर्णिमेनंतर दोन दिवसांनी आहे, जो प्रेमी आणि ध्यानसाधक, या दोहोंसाठी सदैवच प्रेमाचे प्रतीक आहे. आणि अखेरीस, २६ फेब्रुवारीला चंद्र लहान होतहोत जेव्हा चमचमत्या चंद्रकोरीसमान होईल, तेव्हा आपण ‘रतजगा’ करणार आहोत—महाशिवरात्रीला आपण संपूर्ण रात्र जागून पूजा-उपासना करणार आहोत. भारतीय पंचांगानुसार ही रात्र वर्षातील सर्वात शुभ असलेल्या तीन रात्रींपैकी एक रात्र मानली जाते, या रात्री आपण मांगल्याचे मूर्तरूप असलेल्या भगवान शिवाच्या आशीर्वादांचे आवाहन करणार आहोत.

एखाद्या विशिष्ट दृष्टीकोनातून किंवा लेन्समधून समयाचा अनुभव घेता येऊ शकतो, या पायाभूत सिद्धान्ताचा स्वीकार जर आपण केला, तर तुम्ही त्या दृष्टीकोनाच्या साहाय्याने या महिन्यादरम्यान ‘समयाच्या समक्ष’मध्ये श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या शिकवणींचे अध्ययन करावे यासाठी मी तुम्हाला प्रोत्साहित करेन. फेब्रुवारी हा प्रेमाचा आणि भगवान शिवाचा महिना आहे. अहेतुक प्रेम आणि अहेतुक कृपा या दृष्टीकोनातून तुम्ही जर गुरुमाईंच्या शिकवणींकडे पाहिलेत, तर त्या शिकवणींविषयीची स्वतःची समज तुम्ही कशा प्रकारे वृद्धिंगत कराल? अशा प्रकारच्या अध्ययनक्रमाचा प्रारंभ करून तुम्हाला कोणते अनुभव येतील असे तुम्हाला वाटते? फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तुम्ही स्वतःला तुमच्या साधनेत कुठवर पोहोचलेले पाहू इच्छिता?

तुम्ही गुरुमाईंच्या शिकवणींचे अध्ययन जसजसे करत जाल, तसतसे कदाचित तुम्हाला असे आढळून येईल की, आपण ज्या विषयांचे अध्ययन करत आहोत त्या सगळ्यांना एकत्र गुंफणारा असा एकच धागा आहे. भारताच्या शास्त्रग्रंथांमध्ये असे वर्णन आढळते की, भगवान शिव हे एक महात्यागी आहेत, जे या जगत-व्यवहाराचे अलिप्त साक्षी आहेत. तथापि, ते देवी पार्वतीशी विवाहदेखील करतात आणि देवीविषयी असलेले त्यांचे विशुद्ध प्रेम, त्यांचे समर्पण अमर्याद आहे. इतकेच नाही, तर भगवान शिव भक्तवत्सल आहेत. श्रद्धेने व भक्तिभावाने एकदा जरी मंत्रोच्चारण केले, तर त्याचेदेखील फळ देणारे, भोळे व दयाळू असे भोलेनाथ आहेत ते. प्रेम, प्रेमाला ओळखते; मंत्र त्याच्या स्रोतामध्ये विलीन होतो; सर्वकाही भगवान शिवाच्या डमरूतून उत्पन्न होणाऱ्या आदिनादामध्ये समाविष्ट होते.

आणि महात्यागी भगवान शिवाच्या आदर्शाचे अध्ययन केल्याने कदाचित आपल्याला या गोष्टीचा संकेत मिळू शकतो की, आपण समयाला आणि त्याचबरोबर प्रेमाला अधिक चांगल्या रीतीने कसे समजून घ्यावे, त्याच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन कसा असावा, आपण त्याच्या दिशेने पाऊल कशा प्रकारे टाकावे. समयाशी [किंवा प्रेमाशी] झुंजण्याऐवजी, समयाशी [किंवा प्रेमाशी] सौदा करण्याऐवजी, असा प्रश्न विचारण्याऐवजी की, असे का वाटते की, समय [किंवा प्रेम!] त्याचा स्वतःचाच मार्ग आखण्याविषयी इतका ठाम आहे, आपण समय जसा आहे तसाच जर त्याचा स्वीकार केला, आणि मग शक्य होईल तितक्या चांगल्या प्रकारे त्याचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला, तर काय होईल? प्रेम ज्या प्रकारे प्रकट होऊ इच्छिते, त्या प्रकारे आपण त्याला प्रकट होऊ दिले, तर काय होईल? कदाचित तेव्हा, समय हादेखील चंद्राप्रमाणे निर्मळ आणि निष्पक्ष जरी राहिला, प्रेमाचा आपला अनुभव आसक्ती आणि अनासक्ती यांच्यामध्ये हेलकावे जरी घेत राहिला, तरीही आपल्याला हे ज्ञात होईल की, समय आपल्या बाजूने असणे, याचा काय अर्थ आहे. आपल्याला हे ज्ञात होईल की, आपल्यापैकी प्रत्येकजण प्रेमाच्या बाजूने आहे, याचा अर्थ काय आहे.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.